**गणेशोत्सव हा “राज्य महोत्सव” साजरा करताना उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर राबविण्याची कार्यपद्धती विहित करणे व सदर स्पर्धेसाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-पुलदे-२०२५/प्र.क्र.११५ (१२६४४६७)/सां.का.२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक: १७ ऑगस्ट, २०२६

<u>संदर्भ:</u> १) शासन निर्णय क्र.पुलदे-२०२५/प्र.क्र.११४(१२५५४१२) सां.का.२ दि.१४.०८.२०२५.
२) शासन निर्णय क्र. पुलदे-२०२५/प्र.क्र.११५(१२६४४६७) सां.का.२ दि.२०.०८.२०२५
३) संचालक,पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,मुंबई यांचे दि.१५.०७.२०२६ रोजीचे पत्र

**प्रस्तावना:**

राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा "राज्य महोत्सव" म्हणून साजरा करण्याबाबतचा निर्णय संदर्भीय शासन निर्णय क्र.१ अन्वये शासनाने घेतलेला आहे. त्या अनुषंगाने विविध स्पर्धा, उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कृत करण्यात येते.

गतवर्षी उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अन्वये तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर राबविण्यात आल्या आहेत. दि.०८.०६.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत मा. मंत्री महोदय, (सांस्कृतिक कार्य) यांनी उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेची व्याप्ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरापर्यंत वाढविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अधिक्रमित करण्यात येत आहे. पु ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेची व्याप्ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरापर्यंत वाढवून सदर स्पर्धेची तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

गणेशोत्सवा दरम्यान उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राबविण्याबाबतचा संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अधिक्रमित करण्यात येत आहे. राज्यातील गणेशोत्सव हा “राज्य महोत्सव” म्हणून साजरा करताना पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्याकडून राज्यातंर्गत राबविण्यात येणारी “उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा” याची व्याप्ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वाढविण्यात येत आहे. सदर स्पर्धेची तालुका,

जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यपद्धती विहित करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. याद्वारे "उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा" आयोजित करण्यास होणाऱ्या **एकूण रु. २,२७,६०,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी सत्तावीस लाख साठ हजार फक्त)** इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेत सहभागी होण्याकरिता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची पुरस्कारासाठी निवड होण्याच्या दृष्टीने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळकरीता खालीलप्रमाणे निकष ठरविण्यात आले आहेत.

**अ) तालुका,जिल्हा आणि राज्यस्तरीय निकष**

| अ.क्र. | मुद्दा | गुण |
|---|---|---|
| १. | **कलांचे जतन व संवर्धन :**<br>• गायन<br>• वादन<br>• नृत्य नाट्य<br>• दशावतार<br>• पोवाडा<br>• लावणी<br>• झाडीपट्टी<br>• खडिगम्मत<br>• वहिगायन<br>• चित्रकला<br>• चित्रपट<br>• शिल्पकला<br>• मूर्तीकला<br>• विविध कलांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन<br>• लुप्त होणाऱ्या कलांचे विविध माध्यमांतून संवर्धन इ. उपक्रम. | २० |
| २. | **संस्कृतीचे जतन व संवर्धन:**<br>• दुर्मीळ नाणी, शस्त्र, भांडी इ. विषयक प्रदर्शने<br>• कवी संमेलन<br>• पुस्तक मेळा<br>• अभिवाचन<br>• वक्तृत्व स्पर्धा<br>• निबंध लेखन स्पर्धा<br>• साहित्य विषयक उपक्रम<br>• लुप्त होणाऱ्या कलाविष्कारांचे संवर्धन | २० |

| | | |
|---|---|---|
| | • पारंपरिक व देशी खेळांच्या स्पर्धा<br>• मंडळाचे व संस्थांचे ग्रंथालय. इ. उपक्रम. | |
| ३. | **निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे जतन व संवर्धन:**<br><br>• वने, निसर्ग, गडकिल्ले, राष्ट्रीय व राज्य स्मारक यांचे जतनसंवर्धन, जनजागृती व स्वच्छता,<br>• पर्यटन व सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणासाठी केलेले जनजागृतीपर कार्य व संवर्धन कार्य इ. | २० |
| ४. | **सामाजिक कार्य:**<br><br>• महिला- जेष्ठ नागरिक वंचित घटक, दिव्यांग अशा विविध समाजघटकांसाठी आयोजित केलेले उपक्रम.<br>• शासनाने राबविलेल्या विविध लोकोपयोगी योजना, संकल्पनांवर आधारित उपक्रमाशी संबंधित कार्य; उदा. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव इ.<br>• आधुनिक तंत्रज्ञान, गाव दत्तक योजना, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, कृषी, विज्ञान, समाज सुधारणा विषयक उपक्रम, अंधश्रध्दा व अनिष्ट रुढी परंपरा चालीरीती यावर प्रबोधन करणारे कार्यक्रम व कार्य इ. | २० |
| ५. | **गणेशोत्सव आयोजनातील विधायकता:**<br><br>• पर्यावरणपूरक मूर्ती<br>• पर्यावरणपूरक सजावट व विद्युत रोषणाई<br>• ध्वनि, वायू व जलप्रदूषण विरहित परिसर<br>• उत्सव काळात गणेशभक्तांसाठी देऊ केलेल्या प्राथमिक सुविधा<br>• आयोजनातील शिस्त व परिसरातील कायमस्वरूपी स्वच्छतेविषयी जनजागृती व कार्य<br>• गणेशभक्तांसाठी असणाऱ्या सुविधा प्रथमोपचार पेटी, पाणी इ. सुविधा<br>"एक गाव एक गणपती" सारखे विधायक उपक्रम असणारे मंडळ<br>• मंडळाच्या कार्यकारणीत महिलांची संख्या एकूण पदांच्या किमान ३० टक्के असणारे मंडळ इ. विधायकता | २० |
| | **एकूण** | **१००** |

ब ) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयस्तरावरील निकष

| अ.क्र. | मुद्दा | गुण |
|---|---|---|
| १. | **कलांचे जतन व संवर्धन :**<br>• गायन<br>• वादन<br>• नृत्य नाट्य<br>• दशावतार<br>• पोवाडा<br>• लावणी<br>• झाडीपट्टी<br>• खडिगम्मत<br>• वहिगायन<br>• चित्रकला<br>• चित्रपट<br>• शिल्पकला<br>• मूर्तीकला<br>• विविध कलांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन<br>• लुप्त होणाऱ्या कलांचे विविध माध्यमांतून संवर्धन इ. उपक्रम. | २० |
| २. | **संस्कृतीचे जतन व संवर्धन:**<br>• दुर्मीळ नाणी, शस्त्र, भांडी इ. विषयक प्रदर्शने<br>• कवी संमेलन<br>• पुस्तक मेळा<br>• अभिवाचन<br>• वक्तृत्व स्पर्धा<br>• निबंध लेखन स्पर्धा<br>• साहित्य विषयक उपक्रम<br>• लुप्त होणाऱ्या कलाविष्कारांचे संवर्धन<br>• पारंपरिक व देशी खेळांच्या स्पर्धा<br>• मंडळाचे व संस्थांचे ग्रंथालय इत्यादी उपक्रम. | २० |
| ३. | **महाराष्ट्राच्या संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार :**<br>• महाराष्ट्रातील वने, निसर्ग, गडकिल्ले, राष्ट्रीय व राज्य स्मारक यांचे प्रचार आणि प्रसार कार्य इ. | २० |
| ४. | **सामाजिक कार्य:**<br>• महिला- जेष्ठ नागरिक वंचित घटक, दिव्यांग अशा विविध समाजघटकांसाठी आयोजित केलेले उपक्रम. | २० |

| | | |
|---|---|---|
| | • महाराष्ट्र संस्थांना नैसर्गिक आपत्तीत व अन्य प्रसंगी केलेली मदत | |
| ५. | **गणेशोत्सव आयोजनातील विधायकता:**<br>• पर्यावरणपूरक मूर्ती<br>• पर्यावरणपूरक सजावट व विद्युत रोषणाई इ.<br>• ध्वनि, वायू व जलप्रदूषण विरहित परिसर<br>• उत्सव काळात गणेशभक्तांसाठी देऊ केलेल्या प्राथमिक सुविधा<br>• आयोजनातील शिस्त व परिसरातील कायमस्वरूपी स्वच्छतेविषयी जनजागृती व कार्य<br>• गणेशभक्तांसाठी असणाऱ्या सुविधा प्रथमोपचार पेटी, पाणी इ. सुविधा<br>• मंडळाच्या कार्यकारणीत महिलांची संख्या एकूण पदांच्या किमान ३० टक्के असणारे मंडळ इ. विधायकता | २० |
| | **एकूण** | **१००** |

**४. स्पर्धेत सहभागी होणा-या तालुका, जिल्हा, राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकरिता मागदर्शक तत्वे / कार्यपध्दती पुढीलप्रमाणे -**

- सदर स्पर्धेत केवळ संबंधित यंत्रणेद्वारे नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक मंडळे सहभागी होऊ शकतात.
- पात्र अर्जदार मंडळांनी अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ganeshostav.pldmka.co.in पोर्टलद्वारे विहित वेळेत आपला अर्ज सादर करावयाचा आहे.
- गणेशोत्सव स्पर्धेअंतर्गत भाग घेणाऱ्या मंडळांपैकी चालू आर्थिक वर्षाच्या मागील सलग दोन वर्षे राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय पारितोषिके प्राप्त झालेली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे पारितोषिकास पात्र ठरणार नाहीत. सदरची अट इतर मंडळांना संधी देण्याच्या उद्देशाने नमूद करण्यात आली आहे. सदरची अट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव मंडळांनाही लागू राहील.
- सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मंडळांसाठी त्यांनी केलेल्या कामाचा कालावधी मागील वर्षाच्या अनंत चतुर्दशी पासून चालू वर्षाच्या अनंत चतुर्दशी पर्यंत असेल.
- स्पर्धेच्या परिक्षणासाठी निवड समितीने दिलेल्या दिवशी व वेळी संबंधित कागदपत्रे व माहिती समितीला उपलब्ध करून देणे, ही संबंधित मंडळाची जबाबदारी असेल.
- सदर गणेशोत्सव स्पर्धेत तालुकास्तरीय/जिल्हास्तरीय/राज्यस्तरीय निवड समितीने घेतलेल्या निर्णयावर कोणत्याही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला आक्षेप घेता येणार नाही.

- या स्पर्धांसाठी संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी हे समन्वयक असतील.
- विजेत्या गणेशोत्सव मंडळास स्पर्धेतील त्यांनी प्राप्त केलेल्या सर्वोच्च पुरस्काराचीच रक्कम देण्यात येईल. उदा. तालुकास्तरीय स्पर्धेतील एखाद्या सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची तालुकास्तरावरील पारितोषिकाकरिता निवड झाल्यास व तद्नंतर त्याच गणेशोत्सव मंडळाची निवड जिल्हास्तरावर झाल्यास, सदर गणेशोत्सव मंडळास जिल्हास्तरावरील पारितोषिकाची रक्कम जास्त असल्याने केवळ जिल्हास्तरावरील पारितोषिकाची रक्कम प्रदान करण्यात येईल.

**५. तालुका स्तरावर सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची निवड करण्याकरिता तालुकास्तरावरील निवड समितीची रचना व कार्य खालीलप्रमाणे:-**

**तालुकास्तरीय निवड समितीची रचना -**

सदर स्पर्धेतील तालुकास्तरीय विजेत्यांची निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी पुढीलप्रमाणे ७ सदस्यीय सदस्यांची समिती करतील :-

| अ.क्र. | पदनाम |
|---|---|
| १. | **शासकीय सदस्य - एकूण ५**<br><br>तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, महानगरपालिकेचे वार्ड ऑफिसर, सार्वजनिक बांधकाम विभागातील उप अभियंता विद्युत/ स्थापत्य, पोलीस निरीक्षक / प्रभारी पोलीस स्टेशन अधिकारी इ. मधून कोणतेही ५ सदस्य निवडावेत. त्यातील सर्वात ज्येष्ठ अधिकारी यांना अध्यक्षपदाची व अन्य एक अधिकाऱ्यांना सदस्य सचिव पदाची जबाबदारी देण्यात यावी. |
| २. | **अशासकीय सदस्य - एकूण २**<br><br>त्या-त्या तालुक्यातील प्रयोगात्मक (गायन, वादन, नृत्य, लोककला इत्यादी) कलेतील १ व दृष्यात्मक (चित्रकला, शिल्पकला, मूर्तिकला इत्यादी) कलेतील १ अशा एकूण २ कलाकारांचा समावेश करण्यात यावा. |

**तालुकास्तरीय निवड समितीचे कार्य:**

- तालुकास्तरीय निवड समिती प्रत्यक्ष उत्सवस्थळी भेट देऊन उत्सवस्थळाचे उच्च दर्जाचे GPS टॅग छायाचित्रण, व्हिडिओ रेकॉर्डिंग करेल व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची / संस्थेची कागदपत्र जमा करून घेईल.
- निवड समितीने परिच्छेद क्र.२ येथील निकषांनुसार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे परीक्षण करावयाचे आहे तद्नंतर परिच्छेद क्र.३ येथील मधील मार्गदर्शक सूचनांनुसार

अभिप्रायासह गुणांकन करावयाचे आहे. सदर समिती आपल्या तालुक्यातून एका विजेत्या मंडळाची निवड करुन सदर गणेशोत्सव मंडळाची शिफारस जिल्हास्तरीय परीक्षणासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे करेल.

- "मुंबई शहर" या एकाच जिल्ह्यात तालुकास्तरीय निवड समिती ऐवजी केवळ जिल्हास्तरीय समिती कार्यरत राहील.
- सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना कोणत्याही परिस्थितीत प्रथम क्रमांकाचे विभागून पारितोषिक देता येणार नाही. याबाबतची दक्षता निवड समितीने घेणे आवश्यक आहे.
- सदर गणेशोत्सव स्पर्धेतर्गत समान गुणांकन प्राप्त झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी ज्या मंडळाच्या स्थापनेला जास्त वर्ष झालेली आहेत त्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास पारितोषिकासाठी प्राधान्य देण्यात येईल.
- तालुकस्तरीय समितीच्या अध्यक्षांनी तालुक्यातील विजेत्या मंडळाची शिफारस करताना विजेत्या मंडळाची सर्व आवश्यक कागदपत्रे, वर्षभरात केलेल्या कामांची व चालू उत्सवातील कामांची व उपक्रमांची GPS टॅग छायाचित्र, परीक्षण अहवाल आणि प्रत्यक्ष परीक्षण करताना केलेले छायाचित्रण, व्हिडीओ इत्यादी सह तालुकास्तरावरील विजेत्या एका मंडळांची शिफारस संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना करावयाची आहे.
- तालुकास्तरावरील विजेत्यांना खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात येतील:-

| **स्तर** | **गुणानुक्रमांक** | **पारितोषिक रक्कम** | **एकूण पारितोषिके** | **एकूण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| तालुका स्तर (मुंबई शहर वगळून) | प्रथम क्रमांक | २५,०००/- | २५० | रु.६२,५०,०००/- |

**६. जिल्हास्तरावर सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची निवड करण्याकरिता जिल्हास्तरावरील निवड समितीची रचना व कार्य पुढीलप्रमाणे:**

**जिल्हास्तरीय निवड समितीची रचना –**

सदर स्पर्धेतील **जिल्हास्तरीय** विजेत्यांची निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी पुढीलप्रमाणे ७ सदस्यीय सदस्यांची समिती गठीत करतील :-

| अ.क्र. | पदनाम |
|---|---|
| १ | **शासकीय सदस्य - एकूण ५**<br><br>जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी, शासकीय कला |

| | |
|---|---|
| | महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक अथवा प्राचार्य, जिल्ह्यातील गट-अ अथवा ब संवर्गातील आरोग्य अधिकारी, जिल्ह्यातील गट-अ अथवा ब संवर्गातील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा अधिकारी, जिल्ह्यातील गट-अ अथवा ब संवर्गातील पोलीस अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्ह्यातील माहिती संवर्गातील गट-अ अथवा व संवर्गातील अधिकारी इ. मधून कोणतेही ५ सदस्य निवडावेत. त्यातील सर्वात ज्येष्ठ अधिकारी यांना अध्यक्षपदाची व अन्य एक अधिकाऱ्यांना सदस्य सचिव पदाची जबाबदारी देण्यात यावी. |
| २ | **अशासकीय सदस्य - एकूण २**<br>त्या-त्या जिल्हयातील प्रयोगात्मक (गायन, वादन, नृत्य, लोककला इत्यादी) कलेतील १ व दृष्यात्मक (चित्रकला, शिल्पकला, मूर्तिकला इत्यादी) कलेतील १ अशा एकूण २ कलाकारांचा समावेश करण्यात यावा. |

**राज्यातील जिल्हास्तरीय निवड समितीची कार्ये:**

- जिल्हास्तरीय निवड समितीने सर्व तालुक्यांतून प्राप्त झालेले परीक्षण अहवाल, छायाचित्रे, चलचित्रे व कागदपत्रांच्या आधारे परिच्छेद क्र.२ मधील निकषांनुसार व परिच्छेद क्र.३ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार गुणांकन करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या मंडळांची निवड करावयाची आहे व सदर मंडळांची जिल्हाधिकारी यांच्याकडे शिफारस करावयाची आहे.
- सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही स्तरावर विभागून पारितोषिक विजेते गणेशोत्सव मंडळ म्हणून घोषित करता येणार नाही. याबाबतची दक्षता सर्वस्तरीय निवड समितीने घेणे आवश्यक आहे.
- मात्र सदर गणेशोत्सव स्पर्धेतर्गत समान गुणांकन प्राप्त झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी ज्या मंडळाच्या स्थापनेला जास्त वर्ष झालेली आहेत त्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास पारितोषिकासाठी प्राधान्य देण्यात येईल.
- **जिल्हास्तरीय पारितोषिकांचे स्वरूप खालीलप्रमाणे :-**

| स्तर | गुणानुक्रमांक | पारितोषिक रक्कम | एकूण पारितोषिके | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| जिल्हास्तर - ३६ जिल्हे | प्रथम क्रमांक<br>व्दितीय क्रमांक<br>तृतीय क्रमांक | ५०,०००/-<br>४०,०००/-<br>३०,०००/- | ३३<br>३६<br>३६ | रु.१६,५०,०००/-<br>रु.१४,४०,०००/-<br>रु.१०,८०,०००/- |
| **एकूण पारितोषिके/रक्कम** | | | **१०५** | **रु.४१,७०,०००/-** |

७. राज्यस्तरावरील निवड समितीची रचना व कार्य खालीलप्रमाणे -

**राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील निवड समितीची रचना -**

जिल्हास्तरीय समितीकडून शिफारस केलेल्या **३६** शिफारशींतून राज्यस्तरीय तीन विजेते क्रमांक निवडण्यासाठी तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रत्येकी तीन विजेते क्रमांक निवडण्यासाठी पुढील प्रमाणे निवड समिती राहील:-

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | सर जे जे कला महाविद्यालयाचे अधिष्ठाता / वरिष्ठ प्राध्यापक | अध्यक्ष |
| २ | पर्यावरण विभागातील वरिष्ठ गट-अ मधील अधिकारी | सदस्य |
| ३ | राज्य जनसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना | सदस्य सचिव |

**राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील निवड समितीची कार्य:**

- सदर निवड समितीने जिल्हास्तरीय निवड समिती कडून प्राप्त एकूण ३६ शिफारसींमधून, जिल्हास्तरीय विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे परीक्षण अहवाल, छायाचित्रे, चलचित्रे व कागदपत्रांच्या आधारे परिच्छेद क्र.२ मधील निकषांनुसार व परिच्छेद क्र.३ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार गुणांकन करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या मंडळांची निवड करावयाची आहे.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयस्तरावरील गणेशोत्सव मंडळाचे परीक्षण GPS टॅग फोटोंच्या व व्हिडिओच्या सहाय्याने करणे.
- परिक्षणानंतर सदर समिती पहिल्या तीन राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विजेत्यांची निवड करेल व त्यांचा अहवाल संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्याकडे सादर करेल.
- सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही स्तरावर विभागून पारितोषिक विजेते गणेशोत्सव मंडळ म्हणून घोषित करता येणार नाही. याबाबतची दक्षता सर्वस्तरीय निवड समितीने घेणे आवश्यक आहे.
- मात्र सदर गणेशोत्सव स्पर्धेतर्गत समान गुणांकन प्राप्त झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी ज्या मंडळाच्या स्थापनेला जास्त वर्ष झालेली आहेत त्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास पारितोषिकासाठी प्राधान्य देण्यात येईल.
- राज्यस्तरीय निवड समितीकडे जिल्हास्तरीय निवड समितीने निवड केलेल्या ३६ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी राज्यस्तरीय तीन विजेत्या गणेशोत्सव मंडळांना

वगळून उर्वरित ३३ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास राज्य शासनाकडून राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात प्रत्येकी रु. ५०,०००/- चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.

**८. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील पहिल्या तीन विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुढील प्रमाणे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल:-**

| **स्तर** | **गुणानुक्रमांक** | **पारितोषिक रक्कम** | **एकूण पारितोषिके** | **एकूण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| राज्य स्तर | प्रथम क्रमांक | ७,५०,०००/- | ०३ | रु.१५,००,०००/- |
| | व्दितीय क्रमांक | ५,००,०००/- | | |
| | तृतीय क्रमांक | २,५०,०००/- | | |
| राष्ट्रीय स्तर | प्रथम क्रमांक | ७,५०,०००/- | ०३ | रु.१५,००,०००/- |
| | व्दितीय क्रमांक | ५,००,०००/- | | |
| | तृतीय क्रमांक | २,५०,०००/- | | |
| आंतरराष्ट्रीय स्तर | प्रथम क्रमांक | ७,५०,०००/- | ०३ | रु.१५,००,०००/- |
| | व्दितीय क्रमांक | ५,००,०००/- | | |
| | तृतीय क्रमांक | २,५०,०००/- | | |

**९. सदर स्पर्धा तालुका/ जिल्हा/राज्यस्तरावर आयोजित करावयाच्या असल्याने त्यासंबधी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत करावयाची कार्यवाही पुढीलप्रमाणे -**

- प्रत्येक जिल्ह्यातून प्राप्त झालेले सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे परिपूर्ण अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचेकडून प्रत्येक जिल्हाधिकारी यांस ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येतील. याकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांनी आपल्या समन्वय अधिकाऱ्यांची माहिती व स्वतंत्र ई-मेल आय डी अकादमीच्या ई मेल पत्त्यावर दरवर्षी गणेश चतुर्थीपासून स्पर्धा सुरू होते, त्या दिवसाच्या किमान १० दिवस आधी अकादमीस कळविणे आवश्यक आहे.
- संबंधित सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आपापल्या जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्यांचे गठन व संनियंत्रण करतील.
- जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय स्पर्धेचे नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी हे काम पाहतील.
- प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना सदर स्पर्धेचा आयोजन खर्च म्हणून रु.१,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) अदा केला जाईल. या प्रयोजनासाठी झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचेमार्फत शासनास सादर करण्यात यावे.

- तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय निकालपत्र तसेच जिल्हास्तरावरील प्रथम क्रमांकांच्या मंडळाच्या परिक्षणाशी संबंधित छायाचित्रे, चलचित्रे व कागदपत्रे इ. सर्व संबंधित माहिती पेनड्राईव्ह मध्ये भरून पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या pldeshpend111@gmail.com ई-मेल पत्त्यावर पाठवावा.
- तालुकास्तरीय तसेच जिल्हास्तरावरील पारितोषिकांची रक्कम अकादमीकडून पाठविण्यासाठी आपल्या कार्यालयाच्या लेखा व अधिदान अधिकारी यांचा सविस्तर तपशील अकादमीच्या ई-मेल पत्त्यावर पाठवावा.
- सर्व तालुकास्तरीय व जिल्हास्तरावरील द्वितीय व तृतीय क्रमांकांच्या विजेत्यांचा सन्मान राज्य पारितोषिक वितरण समारंभानंतर संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने जिल्हास्तरावर करण्यात यावा.
- सदर गणेशोत्सव स्पर्धेअंती आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची यादी स्वतंत्रपणे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात येईल.
- पारितोषिक प्रदान समारंभानंतर उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या ई-मेल पत्त्यावर पाठविणे.

**१०. सदर स्पर्धा आयोजनाबाबत पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे:**

- संपूर्ण स्पर्धेचे समन्वयन करणे.
- स्पर्धेसंबंधित आवश्यक माहिती जिल्हाधिकारी कार्यालयांस व निवड समित्यांस कळविणे आवश्यकतेनुसार निवड समित्यांस मार्गदर्शन करणे.
- स्पर्धेचे अर्ज स्विकारण्यासाठी पोर्टल तयार करणे व पात्र अर्ज संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना तालुकानिहाय पाठविणे.
- जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्यस्तरीय परिक्षणासाठी आलेल्या मंडळांचे समितीमार्फत परिक्षण करून प्राप्त निकालपत्र शासनाकडे पाठविणे.
- शासनाकडून प्राप्त शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांचा एकत्रित पारितोषिक प्रदान समारंभ आयोजित करणे.
- सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय (द्वितीय व तृतीय) क्रमांकांच्या पारितोषिकांच्या रकमा वर्ग करणे

**११. आयोजित करावयाच्या स्पर्धा, ऑनलाईन सॉफ्टवेअर आणि दर्शन पोर्टल तयार करणे व राज्यस्तरीय परिक्षण तसेच पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी अपेक्षित खर्चाचे विवरण पुढीलप्रमाणे:-**

| अ.क्र. | बाबनिहाय तपशील | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १. | पारितोषिक रक्कम<br><br>(३ आंतरराष्ट्रीय + ३ राष्ट्रीय + ३ राज्यस्तरीय विभाग + ३३ जिल्हास्तरीय विभाग + ७२ जिल्हास्तरीय व्दितीय व तृतीय विभाग + २५० तालुकास्तरीय विभाग) | रु.१,४९,२०,०००/- |
| २. | सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर वगळून) स्पर्धा आयोजनासाठी | रु. ३५,००,०००/- |
| ३. | अन्य खर्च (कार्यक्रम आयोजनाकरिता) | रु. ४३,४०,०००/- |
| | **एकूण अक्षरी रु. दोन कोटी सत्तावीस लक्ष साठ हजार फक्त** | **रु.२,२७,६०,०००/-** |

१२. या प्रित्यर्थ होणारा खर्च मागणी क्र. **"झेडडी-०२, २२०५कला व संस्कृती, (१०१) ललित कला शिक्षण, (०७) कला अकादमी, (०७) (०१) पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (२२०५१४६३), ५० इतर खर्च (अनिवार्य)"** या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

१३. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेनंतर पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी शासनास सादर करणे.

१४. संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास या संबधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८१७१५४१११६१४३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NANDA MARUTI RAUT

Digitally signed by NANDA MARUTI RAUT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs, 2.5.4.20=1983A6357BDEA5C5091136D73EC0B1D7D99AF67DF3CCA676C00FAD04572B4AA9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BAF9D9317025580944685E047B9C52D64C532684054F19E1F02C374B78E1773F, cn=NANDA MARUTI RAUT
Date: 2026.08.17 15:42:57 +05'30'

**(नंदा राऊत)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव विधानमंडळ मुंबई
३. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव विधानमंडळ मुंबई

४. उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव विधानमंडळ मुंबई
५. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव विधानमंडळ मुंबई
६. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.उप मुख्यमंत्री , नगर विकास विभाग यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. उप मुख्यमंत्री, उत्पादन शुल्क व अल्पसंख्यांक विभाग , यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय,मुंबई
१०.सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय,मुंबई
११.मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा यांचे खाजगी सचिव
१२.मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३.मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
१४.महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
१५.सचिव, पर्यावरण व वातावरणी बदल विभाग, मंत्रालय, मुंबई (संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे मार्फत)
१६.सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहायक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७.सर्व जिल्हाधिकारी (संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे मार्फत)
१८. अधिष्ठाता / वरिष्ठ प्राध्यापक सर जे जे कला महाविद्यालय, मुंबई (संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे मार्फत)
१९. राज्य जनसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना (संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे मार्फत)
२०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२१.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२.उप सचिव (सां.का.२), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३.संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,मुंबई.
२४.अवर सचिव/कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५.निवडनस्ती,सां.का.२